# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ८/७/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०९) इतिवृत्त**

**मंगळवार, दिनांक ८ जुलै २००८ रोजी** स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे सकाळी ११-३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला श्री.उध्दव घुगे, उप आयुक्त(म), श्री.एम.ए.पठाण, नगर सचिव यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान (मामू)
२. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
३. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
४. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
५. श्री. वसंत नरवडे पाटील
६. सौ. अल्पा विकास जैन
७. श्री. जावेद हसन खान
८. श्री. संजय जोशी
९. श्रीमती जयश्री किवळेकर
१०. श्री. रविकांत गवळी
११. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
१२. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
१३. श्री. सिताराम सुरे
१४. श्री. नारायण कुचे

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान (मामू) : आतंकवाद कोणत्याच धर्मात नाही. अफगणिस्तानात भारतीय दुतावासावर झालेल्या हल्ल्यात मुलकी अधिकारी मृत्यू पावले. तरी त्यांसाठी सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती : सभागृहातर्फे दोन मिनीट स्तब्धता पाळून श्रध्दांजली देण्यात येते.
(यावेळी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

**विषय क्र. ६१ :**

दिनांक **२८/०५/२००८** (का.प.क्र.५) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा. सभापती : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक **२८/०५/२००८** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स.सदस्य यांच्या स्वेच्छा निधीतून प्रस्तावीत विद्युतीकरणाच्या फुटकळ कामांसाठी (ए-१ स्वरूपाची कामे) निविदेच्या प्रचलीत कार्यालयीन पध्दतीमुळे बराच वेळ खर्ची होतो. स्वेच्छा निधीतील कामे वेळीच व्हावी यासाठी प्रभाग "क" अंतर्गत विविध वॉर्डात सर्व स.नगरसेवक स्वेच्छा निधीतील कामांसाठी स्पर्धात्मक निविदेद्वारे कंत्राटदाराची नेमणूक करण्याचे ठरले. त्यानुसार सन २००६-०७ या आर्थिक वर्षात प्रभाग 'क'

अंतर्गत स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून विद्युतीकरणाच्या कामांसाठी रक्कम रूपये ९,०७,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन, स्पर्धात्मक निविदेद्वारे मे.ओसामा इलेक्ट्रीकल्स यांची नेमणूक करण्यात आली होती.

वरील प्रमाणे स्वेच्छा निधीतून विद्युत विषयक केलेल्या विविध कामांपोटी मे.ओसामा इलेक्ट्रीकल्स यांना रक्कम रूपये ८,२५,०००/- चे देयक पारीत केलेले आहे. या व्यतिरिक्त बऱ्याचशा स.सदस्य यांनी त्यांचे स्वेच्छा निधीतुन विद्युत विषयक कामे करण्यासाठी प्रस्ताव दिले असून, या कामांची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ५,९८,९००/- इतकी आहे. या वाढीव प्रस्तावीत कामांमुळे मुळ अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये वाढ होत असून, अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १५,०६,४००/- होत आहे. वाढीव कामांची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ५,९८,९००/- ची नोंद अर्थसंकल्प सन २००७-०८ च्या स्पील कामांमध्ये घेण्यात आलेली आहे.

तरी वाढीव अंदाजपत्रक रक्कम रूपये १५,०६,४००/- मधुन, स्वेच्छा निधी अंतर्गत अंदाजपत्रक रक्कम रूपये ५,९८,९००/- ची कामे नियुक्त कंत्राटदार यांचेकडून करून घेण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स.सदस्य यांच्या स्वेच्छा निधीतील कामे वेळीच व्हावी यासाठी प्रभाग "क" अंतर्गत विविध वॉर्डात सर्व स.नगरसेवक स्वेच्छा निधीतील कामांसाठी स्पर्धात्मक निविदेद्वारे सन २००६-०७ या आर्थिक वर्षात प्रभाग 'क' अंतर्गत स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून विद्युतीकरणाच्या कामासाठी नियुक्त गुत्तेदार मे.ओसामा इलेक्ट्रीकल्स यांचेमार्फत केलेल्या कामाव्यतिरिक्त बऱ्याचशा स.सदस्य यांनी त्यांचे स्वेच्छा निधीतुन विद्युत विषयक कामे करण्यासाठी प्रस्ताव दिले असल्याने वाढीव प्रस्तावीत कामांमुळे रक्कम रूपये १५,०६,४००/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच स्वेच्छा निधी अंतर्गत अंदाजपत्रक रक्कम रूपये ५,९८,९००/- ची वाढीव कामे या कामाचे मुळ नियुक्त कंत्राटदार मे.ओसामा इलेक्ट्रीकल्स यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद**

श्री.सतिष कटकटे : मागील बैठकीमधे मा.सभापतींनी अशी रूलींग दिली होती की, श्री.विष्णू वझे व श्री.पी.जी.पवार यांनी मार्कींग करावी. तरी सुध्दा श्री.एम.एम.खान मार्कींग करीत आहे. श्री.विष्णू वझे व श्री.पी.जी.पवार यांनी कुढे कुढे मार्कींग केली व ती कशा पध्दतीने मार्कींग केली याची माहिती दयावी.

श्री.रविकांत गवळी :गेल्या तिन बैठकीमधे अतिक्रमण विषयी आपण अभिनंदन केले. औरंगाबाद शहरातील सर्व जनता अतिक्रमणामुळे दहशतीखाली वावरत आहे. रस्त्याचे अतिक्रमण काढतांना सदरील रस्ता किती फुटाचा असेल याची जनतेला माहिती नाही. मार्कींग करून अतिक्रमण काढणे हा उपाय नव्हे. सदरील जगा भूसंपादन करून टिडीआर, एफ .एस.आय. देणे महानगरपालिका रस्ता रूंदिकरणात जगा ताब्यात घेतांना १००% जगा बाधीत होते त्यांना मोबदला देणार आहे काय तशी तरतुद अर्थसंकल्पात ठेवली आहे काय?

मा.सभापती : सर्वप्रथम सदरील बैठकीमध्ये सर्व अधिकारी उपस्थित आहे काय? जेगैरहजर असेल त्यांच्यावर कुठल्या प्रकारची कारवाई करता येईल. स्थायी समिती तसेच इतर बैठकीमधे अधिकारी उपस्थित रहात नाही. श्री.घुगे साहेब सुध्दा स्थायी समितीच्या बैठकीत हजर नाहीत. स्थायी समितीच्या बैठकीस अधिकारी महत्व देत नाही. उपआयुक्त (प्र) साहेब बैठकीमधे कुठले अधिकारी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

मा.उपआयुक्त (प्र) : जकातीचे एक प्रकरण सुप्रीम कोर्टात आहे. त्याची सुनावणी दि. १०/०७/२००८ रोजे असल्याने सुनावणीस उपस्थित रहाणेसाठी विधी सल्लागार आणि उपआयुक्त (म) श्री.घुगे दिल्ली येथे गेलेले आहेत.

मा.सभापती :सभापतीस कळवावयास पाहिजेहोते.

उपआयुक्त (प्र) :यापूर्वीही मा.आयुक्तांनी असे निर्देश दिले होते की, बैठकीस अधिका-यांनी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. सदर बैठकीस जे अधिकारी गैरहजर आहे त्यांच्याकडून लेखी खुलासा घेण्यात येईल.

श्री.नरवडे पाटील :मा.सचिव यांचेकडून खुलासा घ्यावा की, सदर अधिका-यांविरूध्द कुठली कारवाई करता येईल.

मा.सभापती :श्री.कांबळे साहेब स्थायी समितीला अनुपस्थित अधिका-यांविरूध्द कुठली कार्यवाही करता येईल ते सांगावे. श्री.घुगे साहेबांचेही कर्तव्य आहे की, सभापतींना विचारून जवे.

उपआयुक्त (प्र) : स्थायी समितीमधे विषयाशी संबधीत अधिका-यांनी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. गैरहजर असणा-या अधिका-यांविरूध्द कारवाई संबधात कायदयात तरतूद नाही. स्थायी समितीनेच निर्णय घ्यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : प्रश्न असा आहे की, मा.आयुक्त सोडून इतर अधिकारी बैठकीस हजर असणे बंधनकारक आहे का व दुसरा प्रश्न समज विद्युतशी संबधीत विषय असेल तर फक्त विद्युत संबधीत अधिकारीच उपस्थित रहावे का? स्थायी समितीमधे वेगवेगळया विषयावर चर्चा होते. स्थायी समितीचे अधिका-यांनी समाधान करावे, स्थायी समितीमधे बैठकीस हजर रहाणे हे अधिका-यांचे सर्वप्रथम कर्तव्य होय. अधिकारी हजर राहू शकत नसेल तर तसे मा.सभापती किंवा सचिव यांना कळविणे आवश्यक आहे. सदर बाब मा.आयुक्तांच्या निर्देशनास आणून देवू, व अधिका-यांना बैठकीस हजर राहणेबाबत सक्त ताकीद दया. मा.आयुक्तांना भेटून सांगू की, गैरहजर अधिका-यांविरूध्द प्रशासन कारवाई करणार की आम्ही सजेस्ट करावी. मा.आयुक्तांचा वेळ घेण्यात यावा.

श्री.नरवडे पाटील :अधिका-यांसाठी आपणा १० मिनिटा अगोदर हजर रहावे व तसे हजेरी रजिस्टर ठेवू जेअधिकारी गैरहजर राहतील त्यांचेविरूध्द कायदेशिर कारवाई करू.

मा.सभापती : कुठले अधिकारी स्थायी समितीच्या बैठकीमधे बसू शकतात व कुठले नाही व आजच्या बैठकीत कुठले अधिकारी गैरहजर आहे या खुलासा श्री.कांबळे यांनी करावा.

उपआयुक्त (प्र) : सर्व विभागप्रमुखांनी हजर रहावे. श्री.डि.पी.कुलकर्णी हे रजेवर आहेत. श्री.भडके नाहीत, जे अधिकारी गैरहजर आहे त्यांच्यावर कारवाई करू. श्री.झनझन,अग्निशमन अधिकारी यांचे प्रतिनिधी आलेले आहे.

श्री.नरवडे पाटील : परिपुर्ण माहिती असलेले समाधान कारक उत्तर देणारे अधिकारी पाहिजे,प्रतिनिधी म्हणून कुणालाही पाठवू नका. सर्वसाधारण नियमाप्रमाणे पुढील बैठकीत उत्तर देतो असे सांगा.

मा.सभापती :स्थायी समितीमधे श्री.भडके, श्री.झनझन, टि.जी.पवार यांचे कडून प्रशासनाने लेखी खुलासा मागवावा, पुढील बैठकीत तो खुलासा सादर करावा. गैरहजर अधिका-यांविरूध्द कडक कारवाई करण्यात येईल. मा.आयुक्तांना भेटून गैरहजर अधिका-यां बाबतची तक्रार देवू.

श्री.रशिद खान मामू :कटकटगेटचा जे रोड आहे तो किती फुटाचा आहे, १००, १२० किंवा ११५ फुटाचा बांधकामास परवानगी असलेले बांधकाम सुध्दा पाडण्यात आले.

कुठल्या नियमाप्रमाणे रोडची अतिक्रमित जगा ताब्यात घेत आहे. परवानगी असलेले बांधकाम पाडण्यात आले यास कोण जबाबदार? नियमानुसार मार्कींग होत नाही. मनमानी कारभार सुरू आहे. कटकटगेटचा रोड १०० फुटाचा असून जनता व आम्ही सहकार्य आवश्यक करू, परंतू १०५, ११० फुटाची मार्कींग करून अतिक्रमण काढले जत आहे. कुठे बैलगाडीचा रस्ता आहे. जगा देत नाहीत. कटकट गेट येथिल लिंबाचे मोठे झाड काढण्यात आले ,झाड काढण्याची परवानगी घेण्यात आली नाही. याचा खुलासा करावा.

श्री.रविकांत गवळी : मागच्या वेळी सांगण्यात आले होते श्री.एम.एम.खानच्या मार्कींगमुळे वाद निर्माण होत आहे.

मा.सभापती :दि.४/७/२००८रोजेच्या ज.क्र.५२ नुसार उपआयुक्त (म) यांनी श्री.विष्णू वझे व श्री.पी.जी.पवार यांची नियुक्ती केली आहे.

श्री.रशिद मामू : परवानगी असलेले बांधकाम पाडण्यात आले आहे.

मा.सभापती :कटकटगेटचे जे बांधकाम पाडण्यात आले तेथे मी स्वत: गेलो होते .तेव्हा श्री.शेटे यांनी सांगीतले की, इमारत निरीक्षकाच्या चुकीमुळे बांधकाम पाडण्यात आले. त्यांनी माफी मागितली मार्कींग स्वत: श्री.शेटे तपासत होते.

श्री.रशिद मामू : मार्कींग चुकीच्या पध्दतीने झाल्यामुळे बांधकाम पाडण्यात आले. जबाबदार कुणाला पकडणार. लोकांमध्ये चूकीचा संदेश जतो.

मा.सभापती : कटकटगेटची मार्कींग कुणी केली त्याचा खुलासा करावा.

उपआयुक्त(सिडको) : श्री.एम.एम.खान यांनी मार्कींग केल्यानंतर आपल्या आदेशान्वये श्री.वझे व श्री.पवार यांनी मार्कींग अंतिम करून अतिक्रमण काढण्यात आलेले आहे. स.सदस्यांनी जे उल्लेख केला ते बांधकाम इमारत निरिक्षकाच्या चूकीमुळे झाले मी आदेश दिले नव्हते.

श्री.रविकांत गवळी :अतिक्रमण काढण्याची एवढी घाई का? शहागंजभागातील अतिक्रमण काढले त्यात प्रशासकीय अधिकारी यांना दोषी धरावे.

मा.सभापती :या प्रकरणात प्रशासकीय अधिकारी दोषी नाही. मार्कींग चुकीच्या पध्दतीने झाली आहे. श्री.एम.एम.खान यांच्या ऐवजी उपअभियंता श्री.वझे व श्री.पवार यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

श्रीमती मोमीन सोफिया :श्री.एम.ए.खान यांचेवर कार्यवाही करावी मार्कींग बाबत चौकशी करावी. चौकशी लेखापरिक्षण यांचेकडून करून घ्यावी खरी मार्कींग होत नाही.

श्री.रविकांत गवळी :क्रांती चौक ते पैठणगेट येथिल एका व्यक्तीने बांधकाम परवानगी घेवून डी.पी.रस्ता सोडून, चार मजली इमारतीचे बांधकाम केलेले आहे. सदरील इमारतीस चार ठिकाणी विवीध स्वरूपात मार्कींग झालेली आहे. २,४,६ फुट मार्कींग झाली आहे. सर्वसामान्य जनतेला सांगण्यात येते की साईड ड्रेन करण्यात येणार आहे,पेव्हींग ब्लॉक साठी १० ते १५ फुट जगा सोडण्यात येत आहे. अतिक्रमण शहराच्या विकासासाठी करतो आहे हे मान्य आहे परंतु अतिक्रमण काढल्यानंतर त्या ठिकाणी खडीकरण ,डांबरीकरण,पेव्हींग ब्लॉक बसविणार नाही का? एका रस्त्यावरील अतिक्रमण काढल्यानंतर त्या रस्त्याचा विकास केल्यानंतर दुस-या ठिकाणी अतिक्रमण काढावे. तसेच ०४ तारखेस

श्री.वझे व श्री.पवार यांची नियुक्ती करून सुध्दा श्री.एम.एम.खान तिथे कसे गेले.

उप आ.(सि.) : मार्कींग पाहावयास बोलावले होते.

श्री.वसंत नरवडे : संपादीत भागासाठी मोबदल्याची काय व्यवस्था केली आहे. ज्या ठिकाणचे अतिक्रमण काढले आहे. त्यांना नविण बांधकाम परवानगी हवी असेल त्यांना जगेवरच परवानगी देण्यात यावी. ६-६ महिणे फिरावे लागेल कधीपाडणार आहे. रिकामे करून घेण्याची तसदी घ्या.

मा.सभापती : पदमपूऱ्याचा अहवाल आला आहे.

श्री.कचरू मोरे : मार्कींग कमी जस्त झाल्याबद्दल तक्रारी उद्‌भवतात. कोणती बेसलाईन धरतात. शिट प्रमाणे एकीकडे डीवाईडर सेंटरला असेल व रोड व डी.पी.शीट एकीकडे दिसते. प्रथम रोडची सेंटर लाईन बेसलाईन शोधली सिमांकन तपासण्यात यावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : रस्ता आपल्या मताने टाकले जत नाही. सरकारची जगा काढावी.

मा.सभापती : सदरील अहवालावर काय कारवाई करता येईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जेमार्कींग केलेले आहे त्याबाबत उपअभियंता श्री.विष्णू वझे व श्री.पवार यांचे काय खुलासा आहे हे जणून घेवू.

श्री.कचरू मोरे : डी.पी. प्लॅन अनेक वेळा बदल झाला आहे.

श्री.रशिद खान मामू : आपण जनरल बॉडीची मान्यता घेवू, एखाद्या व्यक्तीचा अर्धा भाग संपादनात मधे जत असेल तर सदरील बांधकामाची एनआरव्ही जुनी ठेवून एसएफआय दिलेल्या बांधकामासाठी जुने एन.आर.व्ही.प्रमाणे कर आकारणी करणे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :प्रशासनाने खुलासा करावा की अस करता येईल का?

कर निर्धारक व संकलक : कराधन नियमाच्या तरतुदीनुसार इमारतीमधे बदल झाला नव्याने बांधकाम झाले तर नव्याने कर लावावा लागतो.एफ.एस.आय दिल्यानंतर जे बांधकाम होते ते नविन बांधकाम होईल.

श्री.रविकांत गवळी : १०० टक्के आपण एसएफआय,टिडिआर देवू शकत नाही, १०० टक्के बांधकाम गेल असेल तर त्यांना मोबदला देणे बंधनकारक आहे. २ महिण्यात ३ चूका शहागंजपर्यायी जगा, पदमपुरा चूकीने काढले, चूकीचे मार्कींग काय

श्री.वसंत नरवडे पाटील : पदमपुरा शहर विकास मंजूर योजना पदमपूरा साईड क्र.३१८ व न.भू.क्र. २०१५५ प्रशासकीय इमारतीसाठी आरक्षीत जगा आपली आहे. समाजकल्याण विभागाकडुन पैसे मिळायचे बाकी आहे. न्यायालयाचा न्याय निवाडा झाल्यानंतर ताबा मिळेल तो पर्यंत सदर जगेत कुंपण घालून ती जगा मनपाच्या ताब्यात घ्यावी. विभागीय आयुक्तांचा त्या संदर्भात अभिप्राय मागविला आहे.

उपआयुक्त(सिडको) : एस.एल.ओ. यांना मा.आयुक्तांनी बोलावले होते आपल्याला ताबा दिलेला आहे. कागदोपत्री आपल्याला ताबा दिलेला असून स्ट्रक्चर काढून ताबा दिला नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : कागदोपत्री ताबा घेतला नेमकी कुठल्या अधिका-याने ताबा घेतला. ताबा घेतला परंतू जगेवर स्ट्रक्चर होते म्हणजेकाय?

श्री.संजय जेशी : पदमपुरा येथील जगेचा ताबा कागदोपत्री घेतला म्हणजेकाय? ताबा घेण्याची व्याख्या काय आहे.

उपआयुक्त (सिडको) :संबधीत जगा असेल ती पुर्णत: अतिक्रमण रहित मोकळी करून ती ताब्यात घेणे.

श्री.संजय जेशी : मालक व भाडेकरू यांच्यात न्यायालयात वाद सुरू आहे. संपूर्ण स्ट्रक्चर पाडून मोकळी जगा महानगरपालिकेच्या ताब्यास असायला पाहिजे ताबा घेतला.

श्री.वसंत नरवडे : ताबा घेतलेला नाही म्हणून नगर रचना विभागाने लेखी दिले.

श्री.संजय जेशी : नगर रचना विभाग मार्कींग करून देते.

मा.सभापती : श्री.वझे यांनी खुलासा करावा की, ताबा घेण्याची प्रक्रीया कशा स्वरूपाची असते?

श्री.विष्णू वझे : एस.एल.ओ. ताबा घेतात त्यांचे कडून महानगरपालिकेला मिळतो पदमपु-याती जगा हि टाउन प्लॅनिंगनीच ताब्यात घेतली आहे.

श्री.संजय जेशी : टाउन प्लॅनिंगला मालमत्ता ताब्यात घेण्याचा अधिकार आहे का.

श्री.विष्णू वझे : ताबा पावतीवर ज्या सहया असतात त्या आयुक्तांच्यासाठी म्हणून टाउन प्लॅनिंगचे अधिकारी/कर्मचारी स्वाक्षरी करतात.

श्री.संजय जेशी : पुष्पनगरी येथिल जगेचा ताबा यापुर्वी मालमत्ता विभागातर्फे श्री.रामटेके यांनी घेतला. मालमत्ता विभागानी ताबा कसा घेतला. टाउन प्लॅनिंगचे काम फक्त मार्कींग करणे एवढे आहे.

श्री.विष्णु वझे : सदरील केस मधे ताबा घेण्यात आला आहे.

श्री.कचरू मोरे : डिपी रोड चे अलाइनमेंट फक्त गट चेंज असेल तर बदलता नाही. खुल्या जगेत फुले नगर येथिल घरे तोडण्यापेक्षा रोडची दिशा वळवावी.

श्री.रशिद खान मामू : पुर्वी जे मार्कींग केली आहे ती बदलून दुसरी मार्कींग करावी.

श्री.रविकांत गवळी : आपल्या अधिकाऱ्यांना सांगुन भाडेकरू रिकामे करून घेतात.

श्री.सिताराम सुरे :एखादा अधिकारी चांगले काम करीत असेल तर त्याची बदली करू नये. श्री.एम.एम.खान यांची बदली सहा महिण्यापूर्वीच टाउन प्लॅनिंग मधे झाली आहे. त्यांची बदली करू नये.

श्री.संजय जेशी : आजच्या आजश्री.एम.एम.खान यांचा चार्जकाढून घ्यावा.

मा. सभापती :श्री.एम.एम.खान यांच्या बाबत ब-याचशा तक्रारी प्राप्त झाल्या असून, दि.०१ जुलै २००८ रोजी स्थायी समितीने सुचना केल्यानुसार उपआयुक्त (सिडको) यांच्या ज.क्र ५२ दि.०४ जुलै२००८ च्या आदेशान्वये श्री.पी.जी.पवार व श्री.विष्णू वझे यांना मार्कींग ची जबाबदारी दिली असून त्यानंतरही श्री.एम.एम.खान हे ब-याच ठिकाणी मार्कींग करीत आहे. असे निर्देशनास आले आहे त्यांनी केलेली मार्कींग रद्य करून श्री.विष्णू वझे व श्री.पि.जी.पवार यांची पुन्हा नव्याने मार्कींग करावी व श्री.एम.एम.खान यांची प्रशासनाने इतर विभागात बदली करून पुढील स्थायी समितीच्या बैठकीत अहवाल सादर करावा.

श्री.संजय जेशी : ताबा पावती काय काय ताब्यात घेतले. त्यात काय कालम असतात. ताबा पावतीवर कुठलेच कॉलम नाही मालमत्तेचे क्षेत्र,खुली जगा,खुल्या स्वरूपाची जगा ताब्यात घेतली. सन २००५ ला सदरील जगा ताब्यात घेतली, दि.१०.१०.२००५ ला कोर्ट मॅटर झाले. स्ट्रक्चर असतांना आपण खुली जगा ताब्यात कशी घेतली २००५ पासून कोर्ट मॅटर असतांना कसे घेतले.

मा.सभापती : सदरील स्ट्रक्चर हे कायमस्वरूपी नव्हते.

श्री.सिताराम सुरे : मागच्या बैठकीत कच-याची निवीदा रद्द केली अशी रूलींग दिली होती. परंतू अद्यापही खाजगी गुत्तेदारामार्फत काम सुरू आहे.

मा.सभापती : प्रथम अतिक्रमण विषयी चर्चा करू.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : अतिक्रमण विभागाला अतिक्रमण काढण्यापुर्वी इतर विभागातून माहिती मिळायला हवी. नगर रचना विभागातील ९ ते ४५ मी.रस्त्याचे डिपी रोडची मोजणी करावी. ज्या जगेचे भूसंपादन झाले असून ताब्यात नाही त्याची यादी प्रशासकीय अधिकारी यांनी द्यावी. मार्कींग करतांना अनुभवी कर्मचा-यांचे पथके तयार करावी. ज्या रस्त्याचे मार्कींग झाले असेल त्यात काही न्यायालयीन वाद विवाद हया बाबतची सद्यस्थितीची माहिती/अभिप्राय विधी विभागाने अतिक्रमण विभागास दयावी. पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवून अतिक्रमण काढावी. अतिरीक्त शहर अभियंता यांनी रस्ते ,ड्रेनेज, फुटपाथ बांधावे, स्वच्छता निरीक्षक यांची स्वच्छतेची जबाबदारी राहील. विद्युत विभागाने रस्त्याच्या मधे येते असलेले खांब बाजुला काढावे.

श्री.संजय जेशी : सदरील काम हे प्रशासनाचेच आहे. जे पर्यन्त आपल्याकडे बजेट येत नाही तो पर्यंत अतिक्रमण काढणेचे काम चालू ठेवावे कमी खर्चाचे आहे.

श्री.रशिद मामू : अतिक्रमण विभागातील अधिकारी,कर्मचारी हे अतिक्रमण काढण्याचे काम चांगल्या रितीने पार पाडीत असून ते कार्यालयीन कामाव्यतिरीक्त जस्तीचे काम करीत आहे. त्या सर्वांना जस्त कामाचा मोबदला द्यावा. ज्यांचे घर जते त्यांचे पुन:र्वसन करावे. हर्सुल,नारेगांव येथे जगा ठेवलेली आहे.

श्री.सिताराम सुरे : आय.आर.डी.पी.अंतर्गत विविध रस्त्यांचे डीफर पेमेंटवर काम करतो रस्त्यामधे एमएसइबीचे पोल आहेत त्यांच्या बद्दल एमएसइबीला काही पत्रव्यवहार चालू आहे काय सदरील पोल रस्त्यातून हटवावे.

श्री.वसंत नरवडे पाटील : दिल्ली गेट ते ताज हॉटेल येथिल पोल रस्त्याच्या मधोमध असून ते तेथून हटविण्यात यावे.

मा.सभापती : शहरातील अतिक्रमण काढणे, रस्तारूंदीकरणाची कामास सुरूवात झाली आहे. मा.आयुक्त श्री.बंड साहेब,उप आयुक्त शेटे प्रशासकीय अधिकारी,व त्यांचा कर्मचारी वर्ग रात्र दिवस काम करत आहेत तसेच टाउन प्लॅनिंगचे कर्मचारी हे ६ ते ७ तास काम जस्तीचे करीत आहे त्याचा मोबदला देण्याची शिफारस स्थायी समिती मा.आयुक्त यांना करीत आहे. नगर रचना विभागातील शहर विकास आराखडयातील ९ ते ४५ मिटर रस्त्याचे डिपी रोडची मोजणी करावी. मार्कींग करतांना अनुभवी कर्मचा-यांचे पथके तयार करावी. ज्या रस्त्याचे मार्कींग झाले असेल त्यात काही न्यायालयीन वाद विवाद हया बाबतची सद्यस्थितीची माहिती/अभिप्राय विधी विभागाने अतिक्रमण विभागास दयावी. पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवून अतिक्रमण काढावी. अतिरीक्त शहर अभियंता यांनी रस्ते ,ड्रेनेज,खडीकरण,डांबरीकरण, फुटपाथ बांधावे, संबधीत जगेवरील अतिक्रमण काढल्यानंतर तिथे पुन्हा अतिक्रमण होणार नाही व स्वच्छतेची याची दक्षता वॉर्ड अधिकारी,स्वच्छता निरीक्षक यांनी घ्यावी. विद्युत विभागाने रस्त्याच्या मधे अडथळीत असलेले खांब बाजुला काढावे. डिपी रोड १०० फुटाचा असेल तर

मार्कीग १०० फुटाचीच असली पाहिजे मनपामधे रूंदिकरणात जगा जत असेल तर पर्यायी जगा प्रशासनाने देण्याचा विचार करावा.

उपआयुक्त (सिडको) यांच्या ज.क्र५२दि.०४ जुलै२००८ च्या आदेशान्वये शहरातील ११ रस्त्याचे अगोदर मार्कीग करून ताब्यात घ्यावे. महानगरपालिका गार्डन मोकळी जगा महानगरपालिकेची जगा प्रशासनाने तात्काळ ताब्यात घ्यावी.

श्री. सिताराम सुरे : कलम ३७ नुसार डिपीरोड थोडासा वळविता येतो. त्यानुसार रोड थोडासा वळविण्यात यावा.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

उ.आ.न.र.श्री.विष्णु वझे :विकास योजनेमधे जे डिपी रोड आहे. मायनर चेंजेस अलाईनमेंन्टमधे करावयाचे असेल तर सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून शासनाची मंजूरी घ्यावी लागेल.

मा.सभापती : सर्वसाधारण सभेच्या अधिकारात असेल तर तसे करता येईल.

श्री.सिताराम सुरे : मागील बैठकीत हडको सिडकोत खाजगी गुत्तेदारामार्फत साफसफाईचा करार रद्य केला होता परंतु आज सुध्दा गुत्तेदारामार्फत साफसफाई सुरू आहे. गुत्तेदाराला कुणी परवानगी दिली.

मा.सभापती : आरोग्य अधिकारी यांनी खुलासा करावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:स्वच्छता कुठे थांबविता येत नाही. नविन निविदा बनविण्याचे काम चालू आहे. सदरील कामास साधारणत: एक महिण्याचा कालावधी लागणार आहे. गुत्तेदारास ३० जुन पर्यंत्न मुदतवाढ दिलेली आहे. एक महिण्याची मुदतवाढ मा.आयुक्त यांच्या अधिकारात देय होते.

श्री.सिताराम सुरे : उद्या साफसफाई कामगारांचे पगार कोण देणार.

श्री.सतिष कटकटे : रद्द केले साफसफाई कोणी करावी आदेश दिले का.

सौ.जयश्री किवळेकर :सबंधीत संस्थेवर आरोग्य वैद्यकीय अधिकारीयांचे नियंत्रण नाही. शहरातील विकास हा स्वच्छता हया सेवेवर अवलंबून आहे. स्वच्छतेच्या बाबतीत मनपाचे दुर्लक्ष होत आहे. यात तडजेड करता येणार नाही. ३-६ महिने वाढवा यावर नियंत्रण कोणाचे.

मा.सभापती : सदर संस्थेवर कुणाचे नियंत्रण आहे,स्वच्छतेची जबाबदारी कुणावर आहे तसेच आजची स्थिती काय आहे?

आरोग्य वैद्यकीय अधिकारी: वॉर्डामधे स्वच्छता निरीक्षक स्वच्छतेचे काम पहातो, संबधीत गुत्तेदाराकडून स्वच्छता करून घेणे हि स्वच्छता निरीक्षक यांची जबाबदारी आहे. स्वच्छता निरीक्षका नंतर वॉर्ड अधिकारी यांची जबाबदारी आहे.

श्री.रशिद खान मामू : स्वत: गुत्तेदार स्वच्छतेची पाहणी करतो , गुत्तेदारावर कुणाचेच नियंत्रण नाही. त्यांचा स्टाफ कमी आहे. एका भागातील स्टाफ दुसरीकडे वापरतो.

सौ.जयश्री किवळेकर : स्वच्छता निरीक्षक निवडणूकीच्या कामासाठी नियुक्ती झालेली असून दोन्ही कडे ते लक्ष देवू शकत नाही. गुत्तेदाराला दुरध्वनी केल्यावर विवीध स्वरूपाच्या समस्या सांगून स्वच्छतेवर कानाडोळा करतो. स्वच्छता निरीक्षक गेल्या अनेक दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूकीच्या कामासाठी गेले आहे त्यानंतर स्वच्छतेची जबाबदारी कुणावर आहे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : सर्वच स्वच्छता निरीक्षक निवडणूकीच्या कामकरीता नियुक्त नाही. कर्मचारी पुरेशी नसल्याकारणाने त्यांच्या जगी इतर स्व.नि. नेमलेले नाही. गुत्तेदारांनी स्वच्छता न केल्यास त्यांना दंड आकारण्यात आला आहे. वार्ड अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : आपण विभाग प्रमुख असुन आपन स्वत: फिरून स्वच्छतेची तपासणी केली आहे का? उन-१,एन-२ भागात नालीत कचरा टाकलेला असतो कचरा खड्डा करून पेटवून देतात. आस्थापना विभागातून निवडणूकीच्या कामासाठीची यादी गेली असेल. टेक्नीकल स्टाफची निवडणूकीच्या कामासाठी नियुक्ती न करता क्लार्कची नियुक्ी करावी.

सौ.जयश्री किवळेकर : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी कुठल्या कुठल्या वॉर्डात भेट देवून स्वच्छतेची पाहणी केली आहे. काय निदर्शनास आले.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : औरंगाबाद मनपातील सहा प्रभागामधे भेट दिलेली आहे. कचरा जळू नये म्हणून सूचना दिलेल्या आहेत व दंड ही केले आहे. वॉर्ड ब मधे ठेकेदाराला १००० रूपये दंड आकारण्यात आलेला आहे.

सौ.जयश्री किवळेकर : प्रभाग ई मधे केव्हा भेट दिली आहे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : तिनवेळा प्रभाग ई मधे भेट दिली आहे.

श्री.कचरू मोरे : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी नगरसेवकांना भेटणे आवश्यक वाटत नाही का?

श्री.वसंत नरवडे : दिलेल्या नॉर्मस प्रमाणे एक किलोमिटर ८ माणसे कार्यरत पाहिजे, कराराप्रमाणे किती माणसे आहे. लेबर हे कमी असून कमी माणसांकडून कामे केली जते त्यामुळे साफसफाई योग्य पध्दतीने होत नाही. माणसे कमी असून सहा सहा महिण्यांपासून पगार नाही. किती लेबर आले आहे याची नोंद आरोग्य खात्याकडे नाही. मनपाच्या लेबर कडुन साफसफाई केली जते. औरंगपु-यातील सर्व्हिस लाईन साफ करण्याकरीता वारंवार संपर्क करीत आहे. परंतू साफसफाई होत नाही. वॉर्ड अधिकारी,आरोग्य वैद्यकीय अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, यांचे कुणाचेच नियंत्रण नाही. माणसे कमी पेमेंट जस्त कमी कर्मचाऱ्यांमध्ये काम चालू आहे. नगरसेवकांची गल्ली साफ केली म्हणजे सर्वच साफ झाले असे नाही. मा.उपआयुक्त यांची नेमणूक करून यासर्वांवर नियंत्रण ठेवले गेले पाहिजे दर तिन दिवसांनी अहवाल सादर केला पाहिजे दंड वसूल होते असे दाखवून दिशाभूल होते ताबडतोब मजूर उपलब्ध व्हावेत.

श्रीमती मोमीन सफिया : माझ्या वार्डात फवारणी होत नाही.

श्री.मोहन मेघावाले :माझ्या वार्डातही साफसफाईची समस्या आहे. संबधीत संस्थेच्या माणसांना पगार न दिल्याने माणसे कामावर येत नाही. पगार देण्याची जबाबदारी कोणाची. वारंवार सुरवातीपासून सदर संस्थेबद्यल बोलत आहे परंतु कारवाई होत नाही.

श्री.संजय जेशी : प्रशासनाने लक्ष ठेवावे.

मा.सभापती : खाजगी गुत्तेदारामार्फत साफसफाईचे काम दिले आहे ते मागील बैठकीमधे रद्य केलेले आहे. सध्या ज्या संस्थेमार्फत काम सुरू आहे ते प्रशासनाच्या देखरेखखाली काम करीत आहे. साफसफाई होत नाही. स्वच्छता निरिक्षक नाहीत दखल घयावी. सदर संस्थेबद्यल तक्रार वाढलेल्या असून त्या संस्थेस स्थायी

समिती काळया यादीत टाकीत आहे. यानंतर सदर संस्थेकडून साफसफाईचे काम करून घेवू नये. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी नगरसेवकांना सोबत घेवून सर्व वार्डात साफसफाईच्या कामावर जतीने लक्ष दयावे. प्रत्येक आठवडयातून दोनवेळा दर तिन दिवसांनी साफसफाईचा अहवाल स्थायी समितीच्या बैठकीत सादर करावा.

श्री.संजय जेशी :पीरबाजर येथील काम बीओटीवर देण्यात आलेले आहे. सदरचा बाजर कधी सुरू होणार आहे. तिन पुल झाल्याशिवाय पोहचता येणार नाही. पुल केव्हा होणार तसेच त्या जगेचे अॅग्रीमेंन्ट किती दिवसांसाठी होते याचा खुलासा व्हावा.

उपअभियंता (बीओटी) : पीरबाजर येथिल पेव्हींग ब्लॉकचे काम पुर्ण केलेले आहे. ६५०० स्के.मीटरचे काम पुर्ण झालेले आहे. कायमस्वरूपी ४० भाजी मार्केटचे काम सुरू आहे. आठवडी बाजर सुरू करण्यासाठी निविदा स्थायी समितीला पाठविले आहे.

श्री.संजय जेशी : दर्ग्याच्या कमाणीतून रोज ट्राफीक जम होते. बाजर सुरू केला तर वाहतूकीची समस्या निर्माण होईल. स्थायी समिती मधे जरी विषय आला तरी प्रश्न वाहतूकीची समस्या चा प्रश्न उपस्थित होईल. त्यामुळे तिन एप्रोच होणे गरजेचे आहे. ३ पुल होणे गरजेचे आहे. मेनरोड वरून अप्रोच होईल दुर्लक्ष झालेले आहे. लवकर करावे. बीओटी तत्वावर सदरील काम देण्यात आले आहे ते किती कालावधीसाठी आहे. अमरप्रीत ते बीड बायपास हा ऐतिहासिक रस्ता तेथून जतो. सध्या बाजर सुरू केला तर मोठा प्रश्न निर्माण होईल म्हणून सुरवातीस तिथे भिंत घालावी लागेल. म्हणजे दर्ग्याकडून न जता मुख्य रस्त्याकडून लोक जतील. कमाणीच्या बाजूला पुल झाल्याशिवाय वाहतुकीचा प्रश्न सुटणार नाही. तिन पुल करणे गरजेचे आहे. सदरील पुल किती वर्षामधे हाणे गरजेचे आहे. अॅग्रीमेंटची कॉपी सर्व सदस्याना दयावी. बँक गॅरंटी बद्यल माहिती दयावी. पुल बांधल्याशिवाय निवीदा काढू नये.

श्री.वसंत नरवडे : तिन पुलाचे प्रपोजल सादर केलेले आहे का?

मा.सभापती : तिन पुलाचे बांधकाम केव्हा केले जईल खुलासा करावा?

उपअभियंता (बीओटी) : इमारत परवानगी बांधकामासाठी टाउन प्लॅनिंगमधे दिलेले आहे. परवानगी मिळाली की पुलाचे काम सुरू करता येईल. अॅग्रीमेंटची कॉपी पुढील बैठकीमधे सादर केली जईल.

मा.सभापती :महानगरपालिका आणि गुत्तेदार यांच्यात झालेल्या अॅग्रीमेंटची कॉपी ०३ दिवसात स्थायी समितीच्या १५ सदस्यांना पुरविण्यात यावी. तसेच पुलाबाबतची सर्व माहिती ०८ दिवसांच्या आत स्थायी समितीमधे सादर करावी. बीओटी तत्वावरील सर्व प्रोजेक्टच्या अॅग्रीमेंटची कॉपी पुढील बैठकीमधे सादर करावी. सीटीबस व जकात करारनाम्याची प्रत ही देण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : महानगरपालिकेचा महसूल वाढण्याच्या दृष्टीने मोठमोठया व्यवसायीकांची मालमत्ता कराची बाकी असलेल्यांची यादी तयार करण्यास सांगीतले होते.

मा.सभापती :स्थायी समितीने यादी तयार करण्यासाठी १ महिण्याची मुदत दिलेली आहे.

श्री.रविकांत गवळी : महानगरपालिकेमधे ज्या गुत्तेदारांना काळया यादीत टाकलेले आहे अशे गुत्तेदारांमार्फत सध्या काम सुरू आहे.

मा.सभापती : प्रशासनाने व स्थायी समितीने ज्या गुत्तेदारांना काळया यादीत टाकलेले आहे त्यांची यादी प्रशासनाने पुढील बैठकीमधे सादर करावी.

श्री.नारायण कुचे : संत एकनाथ रंगमंदिरच्या पार्कींग बाबत ३ दिवसात अहवाल सादर करण्यास सांगीतले होते.
परंतू अद्याप पर्यंत अहवाल अप्राप्त आहे.

मा.सभापती : प्राथमिक अहवाल आलेला आहे. श्री.वझे यांनी मुदतवाढ मागीतली आहे. ति त्यांना देण्यात आली आहे.

श्री.रविकांत गवळी : क्रांती चौक भागातील सर्व्हे नं.५४ मधील महानगरपालिकेच्या ९एकर जगेची टाउन प्लॅनिगच्या अधिका-यांनी सर्व्हे केला होता. पूर्ण अतिक्रमण विरहीन केल्याशिवाय जउ नये क्रांतीचौक,झांशीकी राणी उद्यान लगत महानगरपालिकेने ९ एकर जमिनीचा अकृषिसारा भरला आहे. लेआऊट केले आहे. शहानुरवाडीतील सर्व्हे नं. ८ आणि १५ मधे ८० फुटाचा नाला होता. त्या नाल्याची सध्या १० फुटाची नाली झालेली आहे.

उपआयुक्त (सिडको) : सर्व्हे नं.५४च्या मिळकती खाजगी मालकांना ९९ वर्षांच्या करारावर महानगरपालिकेने दिल्या होत्या त्याची कारवाई संपलेली आहे. संबधीतांनी पीआर कार्ड केले याबाबतची सर्व चौकशी,माहिती गोळा करण्याचे श्री.खरवडकर यांचे मार्फत काम चालू आहे. सदरील अहवाल आल्यानंतर पुढील कार्यवाही निश्चितच करण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : महानगरपालिकेकडे सदरील संचिकाच उपलब्ध नसून तत्कालीन उपआयुक्त यांनी सदरील जगेचा ताबा घेतला आहे त्या लोकांकडून कागदपत्र सादर केलेले आहे. त्या आधारे संचिका जमा करून घेतली आहे.

मा.सभापती : तत्कालीन उपआयुक्त यांनी सात बारा महानगरपालिकेच्या नावावर केले. एन ए महानगरपालिका भरत आहे. तत्कालीन अधिका-यांनी झेरॉक्स कागदपत्रे लावून मालक बनविले. पिआर कार्ड बोगस बनविलेले आहे.महानगरपालिकेची साधारण: १०० करोड रूपयांची जमीन आहे. सदर जगेची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर मालमत्ता अधिकारी,श्री.वझे,श्री.खरवडकर यांना पीआर कार्ड,सात बारा बनविण्याचे काम दिले ९ एकर जमीन महानगरपालिकेच्या ४.५० लाख स्वे.फुट जगा पीआरकार्ड त्यांनी सन १९७२ साली त्यांच्या नावावर करून घेतले. महानगरपालिकेची मुळ संचिकेत दुस-या लोकांना मालक बनवून त्यांच्याकडून झेरॉक्स पेपर घेवून संचिकेत लावण्यात आले.

श्री.रशिद मामु : श्री.आलफ खान यांनी पुर्ण रेकॉर्ड दिलेले आहे मग तो रेकॉर्ड गेला कुठे?

श्री.रविकांत गवळी : एवढया महत्वाची जगे बाबत चौकशी करून सदरील जगा आपल्या ताब्यात घेता येईल.

श्री.संजय जेशी :अहवाल सादर करण्यास १५ दिवसांचा अवधी देण्यात यावा.

मा.सभापती :क्रांति चौक येथिल महानगरपालिकेची एकुण ९ एकर जगा असून सदर जगेत काही भाग भाडेतत्वावर दिल्याचे निर्देशनास आले आहे सन १९७१-७२ साली महानगरपालिकेचे असलेले भाडेकरू यांनी खोटे पीआर कार्ड बनवून त्या खोटया पीआर कार्ड आधारे सध्या ते जगेचे मालक असल्याचे भासविण्याचा प्रयत्न करीत आहे. मा.जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये सदरील जगेच्या

२००५-२००६ पर्यंत एन ए भरलेला आहे. सदरील जगा महानगरपालिकेची आहे. म्हणून सदर बाबीची चौकशी करण्याकरीता कार्यकारी अभियंता श्री.पानझडे, उपआयुक्त (म) हे याप्रकरणाची चौकशी करून १५ दिवसांच्या आत स्थायी समिती समोर अहवाल सादर करतील व त्यांना श्री.एस.एस.कुलकर्णी,श्री.खरवडकर, श्री.फईमउद्यीन हे मदत काम करतील. व स्थायी समितीला अहवाल उपआयुक्त (सिडको) यांनी सदरील जगा ताब्यात घेण्याची कार्यवाही लवकर करावी.

सौ.अल्पा जैन :बन्सीलाल नगर मधे महानगरपालिकेची शाळा असून ४०० पेक्षा जस्त विदयार्थी संख्या असून उर्दु बालवाडीचे १८ ते२० विदयार्थी संख्या आहे. मराठी माध्यामाचे एकूण ८ ते १० शिक्षकांची बदली करण्यात आली आहे त्यामुळे विदयार्थी दाखला घेवून जत आहे. तसेच उर्दु बालवाडीचे १८ ते २० विदयार्थी संख्या असून त्यांना शिक्षक उपलब्ध नाही याची विचारणा प्रशासनास केली असता त्यांचा असा नियम आहे की, ३० विदयार्थी संख्या असेल तरच शिक्षक उपलब्ध करून देता येईल. सदरील विदयार्थ्यांना परत पाठवायाचे का काम करणार परवा टी.सी.देत नव्हते त्यावेळी जळून घेवू असे लोक सांगत होते फेब्रुवारीमध्ये ३-४ शिक्षक देण्याचे मान्य केले होते.

मा.सभापती : शिक्षणाधिकारी यांनी खुलासा सादर करावा.

शिक्षणाधिकारी : शाळेत शिक्षक किती असावे याची निश्‍चिती विदयार्थी संख्येनुसार शिक्षण उपसंचालक यांच्याकडुन ठरलेली असते. गेल्या ३०.९.२००७ ला जी विदयार्थी संख्या होती त्यानुसार शिक्षक निश्‍चिती ही डिसेंबर पर्यंत होण आवश्यक होत. शिक्षक निश्‍चिती बाबतची माहिती ३० जुन २००८ रोजे प्राप्त झाली असून तुर्त बन्सीलाल नगर शाळेमधे ३ ते ४ शिक्षक कमी आहेत. शिक्षक निश्‍चिती वरून एकुण ६७ शिक्षक महानगरपालिकेत कमी आहे. शिक्षण सेवक भरतीची कार्यवाही शासनाकडून सुरू झाली असून सप्टेंबर १५ तारखेपर्यंत शिक्षक सेवक कार्यवाही पुर्ण होउन शिक्षक मिळतील. सध्या शिक्षक देता येणार नाही.

श्री.रविकांत गवळी : विदयार्थ्यांची संख्या मागच्या वर्षीपेक्षा वाढली आहे का घटली आहे.

श्री.वसंत नरवडे : १८ ते २० विदयार्थ्यांचे नुकसान होउ नये म्हणून ऍडजेस्टमेंट म्हणून तुर्त शिक्षक उपलब्ध करून दयावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : उर्दु बालवाडी पहिल्यांदाच बन्सीलाल नगर येथे सुरू केली आहे. शिक्षक सेवक भरतीचा संबध यात येत नाही. बालवाडी करीता उर्दुच्या शिक्षीकेची स्पेशल केस म्हणून उपलब्ध करून द्यावे विशेष बाब म्हणून उपलब्ध करून द्यावे.

मा.सभापती : उपआयुक्त (प्र) यांनी विशेष बाब म्हणून बालवाडी शिक्षिका उपलब्ध करून दयावे.

श्री.वसंत नरवडे : पार्कींग बाबत नियोजन समिती नसल्यामुळे पार्कींग बाबत समस्या निर्माण झाली आहे. पार्कींग झोन झाल्याशिवाय वाहतूकीचा प्रश्‍न सुटणार नाही. वाहतूक बेट रेल्वेस्टेशन ते सिटी चौक आणि किराडपूरा,शहागंजते चमण भागात ज्या ज्या ठिकाणी जगा उपलब्ध करून रिझर्व्हेशन टाकून नियोजन करून पार्कींगची सोय उपलब्ध करून दयावी.

मा.सभापती : याबाबत मा.आयुक्त यांचेशी चर्चा करू.
सभा १५ मिनटांसाठी तहकुब करण्यात येत आहे.

**( तहकुब झालेली सभा ठिक ३.५५ वाजता सुरू.)**

- पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाबाबतचा चौकशी अहवालावर चर्चा -

मा.सभापती : विविध चौकात पेव्हर ब्लॉक वसविण्याच्या कामाबाबतचा चौकशी अहवाल मुख्य लेखापरीक्षक यांनी दाखल केला आहे. तो स्विकारण्यात येत आहे.

श्रीमती अल्पा जैन : पंचवटी चौक येथे बसविलेले पेव्हर ब्लॉक चे काम पुर्ण झाले नाही. एका बाजूने दबलेले आहे. ट्राफीक ताबडतोब सुरू केल्याने दबले.

मा.सभापती : श्री.सोनवणे अ.श.अ.यांनी खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम सुरवातीला पंचवटी चौकातुन सुरू केलेले आहे. जमिनीचा जे पृष्ठभाग होता तो पुर्णपणे काढुन टाकण्यात आला सोलिंग करून कॉक्रेटिंग करण्यात आले आहे. पेव्हर ब्लॉक बसवितांना रस्त्याचा सेंटर भाग थोडा वर उचलण्यात आला असून दोन्ही बाजुंना स्लोप काढण्यात आलेला आहे. ट्रॅफिक मुळे रस्त्याचा कुठलाच भाग दबलेला नाही.

श्री.सतिष कटकटे : खाती कॉंक्रीट करून बसविलेले नाही. तेथे खड्डा पडला. कॉंक्रीट बसविणे किंवा नाही पेव्हर ब्लॉक काही ठिकाणी दबलेला आहे.

अति.शहर अभियंता : सेंट फ्रॉन्सीसकडुन येतांना कॉर्नरचे जेब्लॉक आहे त्या साईडचे कॉक्रींट करणे बाकी आहे.

श्री.रविकांत गवळी : १२ व्या वित्त आयोगाकडून जे निधी प्राप्त झाला होता त्याचे शहराचे सुशोभिकरण करण्यासाठी ज्या सहा चौकात इटालियन पेव्हर ब्लॉकचे बसवून १०० ते १५० टन वजनाचे वाहन जवू शकतील अशी निवीदा काढले होते. जे अहवाल प्राप्त झाला आहे त्यात टेक्निकल प्रत घेण्याबाबत त्यात म्हटलेले आहे. त्यामुळे टेक्निकलचा खुलासा घेण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे : अहवालाच्या पान नं. ८ वर परिच्छेद क्र.१० नुसार प्राप्त साहित्याच्या किंमतीच्या केवळ ७५ टक्के अग्रिम देता येतो. या नियमांचे पालन झालेले नाही.

श्री.रशिद मामू : जे काम दिलेले आहे त्याची मुदत १३.०२.२००९ पर्यंत आहे. एका गट्टू बघून हिशोब लावू शकतो की, तो किती फुटाचा आहे किती इंचाचा आहे. त्यावरून एकुण मालाचे मोजमाप काढता येते गणीतातील सुत्राप्रमाणे पुर्ण शिोब लावता येतो दिलेले पेमेंट शेवटच्या बीलातून कपात होते. चौकशीत त्यांनी पत्र देवून उलट मदत केली वास्तविक पाहता त्यांना प्रथम बोलवायला पाहिजे होते त्यांना संधी दिली नाही. धुळेस ही प्रयोगशाळा आहे. नियमाने अग्रिम देता येते ५५% दिले पेव्हर ब्लॉकच्या सुरक्षीततेसाठी त्यांनी कुत्रे ठेवलेले होते. मोजमापा प्रमाणे ५५%असु शकते. सदरील अहवाल टेक्निकलला पाठवावा. तांत्रिक बाबींची तपासणी तांत्रिक लोकांकडून करून घ्यावी.

मा.सभापती : अहवालाच्या पान नं. ८ वर परिच्छेद क्र.१०चा खुलासा लेखा अधिकारी यांनी दयावा.

प्र.मुख्य लेखाधिकारी : या कामाचा आणि महानगरपालिकेच्या प्रलंबित देयकाचा कुठलाही संबध नाही. सदरील काम हे शासनाच्या १२व्या वित्त आयोगाच्या निधीतुन करण्यात आले आहे. १२ व्या वित्त आयोगामधे तिन टप्प्यात रक्कम महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे. एकुण रक्कम ११ कोटीची आहे त्यातील ४३.५ टक्के रक्कम

महानगरपालिकेच्या विकास कामावर खर्च करावयाची आहे. आणि ५६.५ टक्के रक्कम घनकचरा व्यवस्थापनावर खर्च करावयाचा आहे. ४३.५ टक्के रक्कमेतून सदरील काम प्रस्तावित केले आहे. नियमाप्रमाणे सर्व कार्यवाही झालेली आहे.

श्री.सतिष कटकटे : १२ व्या वित्त आयोगाचा निधी केव्हा आलेला आहे. १२व्या वित्त आयोगाचा निधी आल्यानंतर सर्वसाधारण सभेची मान्यता केव्हा घेण्यात आली.

प्र.मुख्य लेखाधिकारी : १२व्या वित्त आयोगाचे जे कामे होते त्यास शासनाने विशेष असे अधिकार पारीत केले होते प्रशासकीय अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यात आलेले आहे.केंद्र शासनाला अधिकार आहे.

श्री.रविकांत गवळी ५६ टक्के घनकचरा व्यवस्थापनावर खर्च व ४४ टक्के विकास कामावर खर्च करण्यात येतील तर ५६ टक्के घनकचरा व्यवस्थापनावर खर्च झालेला आहे काय? का निधी परत गेला आहे.

प्र.मुख्य लेखाधिकारी : १२ व्या वित्त आयोगाचा कुठलाच निधी परत गेलेला नाही. शासनाने मंजूरी दिल्याप्रमाणे कामे चालू आहेत.

श्री.रविकांत गवळी : पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामासाठी केंद्र शासनाचा निधी वापरण्यात येत असल्यामुळे महानगरपालिकेच्या निधीशी काही संबध नव्हता तर देयके देण्याची एवढी घाई का? खाम नदीवर खर्च करण्यास सांगीतले होते परंतु ते वेळेनुसार कॉन्ट्रॅक्ट पध्दत पुर्ण न झाल्यामुळे पैसे परत गेले.

मा.सभापती : खाम नदीवरील निधी परत गेला आहे काय याचा खुलासा श्री.पानझडे यांनी करावा.

श्री.पानझडे : १२ व्या वित्त आयोगामधुन जेअंदाजपत्रक तयार केले होते ते खर्च होणार नाही असे गृहित धरून ते पैसे दुसरीकडे डायव्हर्ड केले होते. निधी परत गेला नाही.

श्री.अ.रशिद मामू : ठराविक कामासाठी पैसा आला होता का याचा खुलासा करावा.

प्र.मुख्य लेखाधिकारी : १२ व्या वित्त आयोगाकडून ठराविक कामासाठी निधी आला नाही तर ४३.५ टक्के सुशोभिकरण व ५६.५ टक्के घनकचरा व्यवस्थापन खर्च करावे. त्याप्रमाणे विविध कामांचे अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता तयार केले होते. त्याप्रमाणे कामे झालेली आहे. निधी खर्च करण्याचा अधिकार मा.आयुक्तांना असेल त्याप्रमाणे खर्च केला आहे.

श्री.रविकांत गवळी : घनकचरा व्यवस्थापनासाठी जे निधी आलेला आहे तो डायव्हर्ट करणार आहे काय?

मा.सभापती : श्री.सोनवणे यांनी खुलासा करावा की, अहवालात नमुद केले आहे की यात महानगरपालिकेचे कुठले हित साधले आहे.

अति.शहर अभियंता : लेखा विभागाशी संबंधी माहिती आहे, मा.आयुक्तांच्या सांगण्यानुसार सदरचा निधी ३१ मार्च पर्यन्त खर्च करायाचा आहे. व ३१ मार्च पर्यन्त पुर्ण निधी खर्च झालेला नाही.

श्री.रविकांत गवळी : अहवाल म्हटल्याप्रमाणे गुत्तेदारास आगाउ रक्कम देण्यास मनाई आहे तथापी अपवाद म्हणून अकस्मिता म्हणून किंवा तातडीच्या वेळी प्राप्त साहित्याच्या किंमतीच्या केवळ ७५ टक्के अग्रीम देता येते या नियमाचे पालन झालेले नाही.

तर अपवाद किंवा अकस्मिता आपणाला का होती. त्यामुळे तांत्रिक सक्षम प्राधिका-यामार्फत सदर सर्व बाबींचा काय अभिप्राय आहे तो घ्यावा.

श्री.कचरू मोरे : लेखापरिक्षक यांनी अहवालत नमुद केले आहे की, पैसे देण्याची घाई करण्यात आलेली आहे. मुद्दा हा उपस्थित होतो की, ॲडव्हान्स देता येतो का? माझ्या माहिती प्रमाणे तो देता येतो. अहवालात नमुद केल्याप्रमाणे ७५ टक्के देता येतो व तो ५१ टक्के ॲडव्हान्स दिलेला आहे व तो नियमाला धरून आहे. महानगरपालिकेचे जे काही देयके बाकी असतांना सदरील रक्कम दिली गेली ते १२व्या वित्त आयोगाचे पैसे परत जउ नये म्हणून दिले. देयके बाकी असतांना सदरील रक्कम दिली गेली आहे. त्यामुळे तांत्रिक सक्षम प्राधिका-यामार्फत सदर सर्व बाबींची चौकशी करण्यात यावी.

श्री.सतिष कटकटे : सदरील निवीदा केव्हा काढण्यात आली व पैसे केव्हा दिले.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : प्रश्न हा आहे की सदरील कामे कोणी प्रपोज केली निवीदा निघाली होती का? ति किती रक्कमेची होती. सदरील निवीदा कितवी आहे. पहिल्या निवीदामधे व आत्ताच्या निवीदामधे किती फरक आहे.फेब्रुवारी २००९ पर्यंत काम करू शकतो. मुदत संपलेली नाही पध्दतशीर होते का पहावे.

श्री.कचरू मोरे : सदरील प्रकार पेव्हर ब्लॉकच्या बाबतीत झालेला नाही तर मार्चच्या शेवटी ३० लाख रूपये हयाच पध्दतीने दिलेले आहे.

मा.सभापती :श्री.सोनवणे याबाबतीत खुलासा सादर करतील.

अति.शहर अभियंता :सदरील कामाची निवीदा १२व्या महिण्यात काढण्यात आली आहे आणि फेब्रुवारीमधे कार्यादेश देण्यात आला आहे. ३१ मार्च पर्यन्त जेवढे मटेरिअल आले २३,२४ मार्च पर्यन्त मटेरिअल आले होते त्या मटेरिअलच्या अगेंन्स्ट मटेरिअल प्राप्त झाल्यानंतर, मटेरिअलची कॉस्ट प्रमाणे व अकाँउन्ट कोडनुसार ७५ टक्के देय असत त्या देयनुसार ७५ टक्के न देता जवळजवळ ५१ टक्के पेमेंन्ट देण्यात आले. पहिल आर.ए.बी.भमेन्स्ट मटेरीअल देण्यात आले आहे.

श्री.रविकांत गवळी : पान नं. ९ परिच्छेद क्रं.१२ व १३ नुसार लेखा विभागातही या देयकाची छाननी केली गेली नाही.त्यामुळे संपूर्ण कामाची सक्षम तांत्रिक प्राधिका-यामार्फत चौकशी करावी.

श्री.अ.रशिद मामू : मटेरीअल अकाउन्ट ऑफीसर पाहणार नाही.

श्री.सतिष कटकटे : अग्रिम रक्कम दिली त्यावेळेस किती माल आला होता.

श्री.अ.रशिद मामू :चौकशी जे पर्यंत होत नाही तो पर्यंत संपूर्ण माहिति उपलब्ध होणार नाही

मा.सभापती :विविध चौकात पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाबाबतचा चौकशी अहवाल मा.मुख्यलेखापरीक्षक यांनी स्थायी समितीकडे सादर केला आहे. सदरचा अहवाल स्थायी समितीने स्विकारला आहे. यावर बरिच चर्चा झाली स.सदस्य श्री.अ.रशीद मामू, श्री.रविकांत गवळी व इतर सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे अहवालाच्या पान क्र. ९ परिच्छेत १३ मधे असे सुचविल्या प्रमाणे सदरील कामाच्या चौकशीत आढळलेल्या बाबी गंभीर व चिंतनीय असल्याने या संपूर्ण कामाची सक्षम तांत्रिक प्राधिका-यामार्फत सखोल चौकशी करून प्रत्यक्षात प्राप्त झालेले साहित्य व झालेल्या कामाची रक्कम निर्धारित करावी त्यानंतर जदा दिलेल्या अग्रिमाची व्याजसह १२.५ टक्के दराने संबंधित ठेकेदाराकडून वसूल

करावी लागेल. असे अहवालात म्हटले आहे व सदरील अहवाल स्विकारण्यात आला आहे. सदर बाबीची संपूर्ण सखोल चौकशी करण्यासाठी आयआयटी मुंबई यांच्याकडुन अहवाल मागविण्यात येईल. त्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

श्री.अ.रशिद मामू : शहानुरवाडी येथिल सर्व्हे नं ८-१५ सीटीएस नं.२२१२००८ मधील ८० फुटाचा नाला सध्या अस्तित्वात नाही, सदरील ८० फुटाची जगा मनपाची आहे. सर्व्हे नं. ८-१५ मधे नाला होता परंतु सदरील नाल्याच्या जगेवर बिल्डरने बांधकाम केले आहे.

श्री.रविकांत गवळी :शहानुरवाडी येथिल सर्व्हे नं ८-१५ सीटीएस नं.२२१२००८मधे नाला अस्तित्वात होता परंतु सर्व्हे नं १५वर बिल्डरने बांधकाम केले आहे. प्रकरणाच्या चौकशीसाठी एस.एल.आर कडे पाठविण्यात आली. एस.एल.आर कडे सदरील प्रकरण ६ महिणे प्रलंबीत आहे. सदरील बिल्डरने बांधकाम परवानगी हया अटीवर देण्यात आली आहे की त्यांच्या विरूध्द एस.एल.आर. चा निकाल लागला तर बांधकाम स्वत:हून काढून टाकण्यात येईल. सदरचा निर्णय महानगरपालिकेकडुन लागला. त्यानंतर बिल्डर हा सेशन कोर्टात गेल्यावर सेशन कोर्टाचा निकालसुध्दा महानगरपालिकेडुन लागला. विधी विभागाने टाउन प्लॅनिंगला व प्रशासकीय अधिका-यांना लेखी पत्र पाठवून सदरील बांधकाम परवानगी रद्य करून बांधकाम ताबडतोब काढण्यात यावे म्हणून कळविले आहे. टाउन प्लॅनिंग विभागाने सदरील बांधकाम परवानगी रद्य केली आहे परंतु प्रशासकीय विभागाने सदरील बांधकाम पाडण्यात आलेले नाही. अतिक्रमण काढले नाही नंतर सदरील व्यक्ती १३ महिन्यानंतर जिल्हा कोर्टात जवून त्यावर स्टे आणलेला आहे. स्टे हा सर्व्हे नं. १५ वर नाल्यावर स्टे नाही नाला सर्व्हे नं.१५ वर येत नाही. त्यामुळे नाल्यावरील अतिक्रमण प्रशासकीय विभागाने काढून टाउन प्लॅनिंग कडून सखोल चौकशी करून योग्य तो निर्णय ताबडतोब घ्यावा.

मा.सभापती : सर्व्हे क्र १५ व ८ मधला नाला या बाबतचा वाद नागपाल बिल्डर व महानगर पालिका यांच्यामधे चालू आहे. अतिक्रमण विभागाने याबाबतची सर्व चौकशी करून श्री.शेट्टटे साहेब व श्री.वाहूळ साहेब यांना अधिकार देण्यात येते की, याची सर्व चौकशी करून त्वरीत कारवाई करण्यात यावी.

श्री.दत्तभाउ पाथ्रीकर : आपण जकात खाजगीकरणाला किती महिण्यांची मुदत वाढ दिलेली आहे. उपकर लावणार असाल तर मधील काळात कोणी त्यांना कंन्टयुनेशन केलेले आहे याचा खुलासा दयावा.

मा.सभापती : सदर संस्थेला मुदतवाढ केव्हा पर्यंत दिलेली आहे. शासनाचे आदेश काय आहेत.

जकात अधिक्षक :मा.स्थायी समितीच्या मान्यतेने दि.०१.०३.२००८ ते २८.०२.२००९ पर्यंत जकात खाजगीकरणाची प्रक्रीया सुरू करण्यात येवून जकात अभिकर्त्याची नेमणुक महानगरपालिकेने केली आहे. यानंतर या कालावधीमधे दि ०६.०२.२००८ रोजी ओमजी फायनान्स प्रा.लि.यांनी शासनाकडे दाद मागीतली होती त्यानंतर शासनाने एक महिण्याची स्थगीती दिली होती. शासनाने दि.३१ मार्च २००८ यात शासनाने आदेश दिला आहे की आयुक्त महानगरपालिका

औरंगाबाद शासना कडील दि.२८.०२.२००८च्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, ड वर्ग महानगरपालिकांचे जकात रद्द करण्याचे धोरण जहिर केले आहे. तथापी औरंगाबाद महानगरपालिका संपूर्ण निवीदा प्रक्रिया पुर्ण केली असून गत वर्षीपेक्षा यावर्षी जस्त रकमेची निवीदा प्राप्त झाल्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल हे लक्षात घेवून कार्यादेश दयावयाच्या निवीदेतील दराने ०४ महिणे किंवा प्रवेश उपकर लागु करण्याची अधिसूचना लागू होईल यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत जकात संकलन अधिकर्त्या मार्फत जकात वसूली करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे. या आदेशाप्रमाणे चार महिण्यांची मुदत महानगरपालिकेस मिळाली होती. तथापी हि मुदत संपत असतांनाच ३० जुन २००८ ला शासनाचे पत्र आले आहे की,उपकर लागु करण्याची तारीख ०१ नोव्हेंबर २००८ निश्चित केली आहे.शासनाच्या पत्रात अशी अट आहे की सध्याच्या जकात संकलन अधिकर्त्याचा करार कालावधी संपल्यानंतर प्रवेशकर उपकर लागू करण्याच्या दिनांका पर्यंत संबधीत महानगरपालिका आणि जकात संकलन अधिकर्ता यांचे सामंजस्य झाल्यास परस्पर संमतीने कराराचा कालावधी वाढविता येईल. सदरच्या अटिनुसार सध्याच्या जकात अधिकर्ता आहे त्याची सहमती घ्यावी लागेल त्याची पुढील कालावधीसाठी जकात संकलन करण्याची तयारी आहे किंवा नाही. यानंतर पुढील कारवाई करता येईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जकाती संदर्भात कुढले धोरण धरावयाचे ते ठरवा नाहीतर पर्यायी उपाय योजना करावी लागेल.

मा.सभापती : या वर्षासाठी करार झाला आहे काय?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : शासन जे निर्णय घेईल त्यावर महापालिकेचा कारभार चालेल काय? शासन जे निर्णय घेईल ते स्विकारायचे किंवा नाही हा आपला अधिकार आहे. शासन फक्त आपणाला मार्गदर्शन करेल.

मा.सभापती : पुढील बैठकीमधे सर्व माहिती दयावी.

''राष्ट्रगिता'' नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद